# स. गा. म. कॉलेज, कराड गणित विभागातील विद्यार्थ्यांचे दहिवडी कॉलेज, दहिवडी येथे राष्ट्रीय परिषदेत पोस्टर सादरीकरणात घवघवीत यश

कराड :







दिनांक २३ जानेवारी २०२६ रोजी दहिवडी कॉलेज, दहिवडी येथे संपन्न झालेल्या एकदिवसीय राष्ट्रीय परिषद “शाश्वत भविष्यातील विज्ञान – आंतरविद्याशाखीय दृष्टीकोन” या विषयावर आयोजित परिषदेत सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड (अधिकार प्रदत्त स्वायत्त) येथील गणित विभागाच्या विद्यार्थ्यांनी रिसर्च पोस्टर प्रेझेंटेशन या विभागात उल्लेखनीय यश संपादन केले.

या परिषदेत गणित विभागातील थिओडोरो फ्युंटस, समृद्धी गणेश काशिद, सानिका संजय लादे, अंकिता आनंदा कुंभार, सायरा मुलानी, निकिता जगन्नाथ कुंभार, धनश्री घोंगडे, निशा मोरे, संजीवनी बागल व श्वेता बिरजे या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.
यामध्ये थिओडोरो फ्युंटस **(B.Sc. I)** याने प्रथम क्रमांक तर समृद्धी गणेश काशिद **(M.Sc. II)** हिने द्वितीय क्रमांक पटकावला.

गणित विभाग प्रमुख श्री. नलवडे सर, माने मॅडम व पोळ मॅडम यांनी देखील आपल्या संशोधन पेपरचे प्रभावी सादरीकरण केले. एकूण ३ प्राध्यापक व ११ विद्यार्थी यांनी या राष्ट्रीय परिषदेत सक्रिय सहभाग घेतला.

या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे, उपप्राचार्य डॉ. यू.बी.मोरे, प्रोफेशनल विभागाचे उपप्राचार्य श्री. एस. ए. पाटील, **IQAC** प्रमुख डॉ. कल्याणशेट्टी सर, रजिस्ट्रार डॉ. सकटे सर तसेच सर्व प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शकांचे अभिनंदन केले.